महाराष्ट्र शासन
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - 400 023.
email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdbu@indiatimes.com
Tel.No:- Jt.Commr: 2660152, Dy.Commr: 2665569, FAX No. 2662370

वाचावे :- या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर 1098/लेबल/5-ब, दिनांक 10 मार्च 1998

---

<u>परिपत्रक</u>

क्रमांक : एफएलआर 1107/41464/5-ब मुंबई, दिनांक 39 मे 2007

1. महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अँड मॅन्युफॅक्चर ऑफ पॉटेबल लिकर नियम 1966 मधील नियम 17 (26) अनुसार महाराष्ट्र राज्यात निर्मित होणाऱ्या भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या बाटल्यावर लावण्यात येणाऱ्या लेबल्सचा वापर करण्यापूर्वी आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून मंजूर करणे आवश्यक असल्याचे तसेच परराज्यात/परदेशात विक्री करण्याआधी लेबल मंजूर करण्याबाबत सुचना उपरोक्त संदर्भित परिपत्रक दिनांक 10 मार्च 1998 अन्वये या कार्यालयातून निर्गमीत करण्यात आले आहे. परंतु परराज्यात/परदेशात निर्यात होणाऱ्या विदेशी मद्याच्या लेबल मध्ये " Not for sale in Maharashtra" आणि ज्या राज्यात निर्यात करावयाची आहे त्या राज्यांत विक्रीकरीता " For sale in (राज्याचे नाव) State only " किंवा परदेशात निर्यात होत असल्यास " For export overseas only " असे छापण्यात येते. परंतु सदर छपाई ही बारीक अक्षरांत करण्यात येत असल्यामूळे त्याचा दुरुपयोग झाल्यास महाराष्ट्र राज्यांत विक्री करीता असलेल्या विदेशी मद्य विक्रीवर याचा परिणाम होऊन शासनाचा महसूल बुडण्याची शक्यता

नाकारतां येत नाही. सदर बाब विचारांत घेतां परराज्यांत/परदेशांत निर्यात होणाऱ्या विदेशी मद्याच्या लेबलमध्ये खालीलप्रमाणे अंशतः बदल करण्यांत येत आहे.

2. वरील परिच्छेद 1 मध्ये नमूद केलेली घोषवाक्ये छापण्यात यावीत तसेच लेबलच्या मागील बाजूस (Back side) खालील माहिती ठळक अक्षरांत कॉंट्रॅस्ट शाईने तिरप्या चौकटीमध्ये छापून अशी लेबले या कार्यालयास मंजूरीसाठी सादर करावीत.

FOR EXPORT ONLY
NOT FOR SALE IN MAHARSHTRA

3. यापुढे विदेशी मद्य निर्यातीसाठी उपरोक्त सुचनांचे पालन केल्यावरच विदेशी मद्य निर्यातीसाठी लेबल मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( रमानाथ झा )
आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति : 1) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
2) सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क
3) सर्व पीएलएल अनुज्ञप्तीधारक महाराष्ट्र राज्य
4) सर्व प्रभारी अधीकारी पीएलएल अनुज्ञप्ती
5) सर्व राज पत्रित अधिकारी
6) या कार्यालयाचे शाखा क्रमांक 5-ब
7) अभिलेख शाखा (5 प्रती)